# विधी विद्यालयांचे सामाजिक विकास ध्येय हवे

## भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेजच्या ऑनलाइन चर्चासत्रातील तज्ज्ञांचे मत

पुणे, ता. २२ : "कायद्याच्या माध्यमातून विकास करायचा असेल तर जास्तीत जास्त सामान्य जनतेपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. त्यासाठी सामाजिक विकास हेच ध्येय विधी विद्यालयांचे असले पाहिजे," असे मत 'भविष्यात सामाजिक विकास करण्याकरिता कायद्याच्या शाळांची भूमिका काय असली पाहिजे' या विषयावरील चर्चासत्रात तज्ज्ञांनी व्यक्त केले.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या 'न्यू लॉ कॉलेज'ने या ऑनलाइन चर्चासत्राचे आयोजन केले होते. सोनिपत जागतिक विश्वविद्यालयाचे प्रा. अजय पांडे, ओ. पी. जिंदाल, सर्वोच्च न्यायालयात प्रॅक्टिस करणारे वकील प्रवर्तक पाठक, गोवा येथील व्ही. एम. साळगावकर लॉ कॉलेजचे प्राध्यापक डॉ. बाबूगौडा पाटील, गांधीनगर येथील 'एनएलयू'चे प्राध्यापक डॉ. सौरव आनंद आदी चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते. न्यू लॉ कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. उज्ज्वला बेंडाळे, समन्वयक उज्ज्वला साखळकर आणि डॉ. अनिसा शेख या वेळी उपस्थित होत्या.

या प्रसंगी प्रा. पांडे म्हणाले, "सामाजिक विकास हा कायद्याच्या माध्यमातून करायचा असेल तर जास्तीत जास्त सामान्य जनतेपर्यंत पोचणे गरजेचे आहे. समाज बदलण्याची शक्ती ही सामान्य जनतेमध्ये आहे. समाज बांधणीसाठी चळवळ निर्माण झाली पाहिजे."

ॲड. पाठक म्हणाले, "कायद्याच्या विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी समाजाकडून नीतिमूल्ये शिकण्याची गरज आहे. आपल्या समाजपरंपरा काय आहेत, हे जाणून घेणे आवश्यक आहे, तरच समाजासाठी आपण योगदान देऊ शकू.

डॉ. पाटील म्हणाले, "सामाजिक विकास करायचा असेल तर समाजासाठी काहीतरी योगदान करा. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो. आपल्या येणाऱ्या पिढीला पण योगदानाचे धडे द्या आणि स्वतःची एक प्रतिमा बनवायला शिका."

डॉ. आनंद म्हणाले, "कायद्याच्या माध्यमातून समाजामध्ये बदल घडायला हवा. त्याचबरोबर लोकांचे सामाजिक वर्तन बघून कायद्याची वाटचाल व्हायला हवी. वास्तव काय आहे, हे बघणे गरजेचे आहे."

**सामाजिक बांधिलकी आपण जपलीच पाहिजे**

ऑनलाइन चर्चासत्रामुळे कायद्याच्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मंडळींचे मार्गदर्शन मिळाले. सामाजिक बांधिलकी आपण जपलीच पाहिजे, असे डॉ. उज्ज्वला बेंडाळे म्हणाल्या. समन्वयक साखळकर व डॉ. शेख यांनी 'कायद्याच्या माध्यमातून सामाजिक विकास केंद्रा'ची माहिती दिली.

# कायदेशीर हक्कांसाठी जनजागृती

**पुणे, ता. २५ :** भारती विद्यापीठ, न्यू लॉ कॉलेजच्या सेंटर फॉर कम्युनिटी डेव्हलपमेंट (सीसीडील) आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बहुजन हिताय, पुणे आणि इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ लायन्स क्लबच्या सहकार्याने 'कायदेशीर हक्कांच्या जनजागृती'साठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

दापोडी येथे झालेल्या या कार्यक्रमात 'बहुजन हिताय'च्या प्रकल्प समन्वयक मालती वानखेडे, विधी सेवा प्राधिकरणाच्या ॲड. प्रीती परांजपे, 'सीसीडील'च्या समन्वयक प्रा. उज्ज्वला साखळकर आणि प्रा. डॉ. अनीसा शेख उपस्थित होत्या.

प्रा. साखळकर यांनी कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ आणि त्याबाबतच्या कायदेशीर बाबी यासंदर्भात माहिती दिली.

डॉ. शेख यांनी हिंदू विवाह कायदा आणि घटस्फोटाच्या कायद्यांविषयी माहिती दिली. ॲड. प्रीती परांजपे यांनी कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा आणि त्याअंतर्गत संरक्षणासंदर्भात चर्चा केली. तसेच कलम ४९८ (ए) चा कशा प्रकारे गैरवापर केला जातो, याची माहिती दिली. मनिषा बर्गे यांनी सूत्रसंचालन केले.

**लोकमत**

# कायदेशीर हक्कांची माहिती लोकांना द्यायलाच हवी

पुणे : भारती विद्यापीठ, न्यू लॉ कॉलेजच्या 'सेंटर फॉर कम्युनिटी डेव्हलपमेंट' (सीसीडील)च्या वतीने आणि 'जिल्हा विधी सेवा प्राधिकरण', 'बहुजन हिताय' आणि 'इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ लायन्स क्लब' यांच्या सहकार्याने 'कायदेशीर हक्कांच्या जनजागृती'साठी कार्यक्रम झाला. 'बहुजन हिताय'च्या प्रकल्प समन्वयक मालती वानखेडे, 'विधी सेवा प्राधिकरणा'च्या ॲड. प्रीती परांजपे, 'सीसीडील'च्या समन्वयक प्रा. उज्ज्वला साखळकर आणि प्रा. डॉ. अनीसा शेख उपस्थित होत्या.

प्रा. साखळकर यांनी कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ आणि त्याबाबतच्या कायदेशीर बाबी यासंदर्भात माहिती दिली. डॉ. शेख यांनी 'हिंदू विवाह कायदा' आणि घटस्फोटाच्या कायद्यांविषयी माहिती दिली. ॲड. परांजपे यांनी 'कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा' आणि त्याअंतर्गत संरक्षणासंदर्भात चर्चा केली.

Hello Pune
Page No. 8 Jul 27, 2021
Powered by: erelego.com

**पुढारी**

## संक्षिप्त



'कायदेशीर हक्कांच्या जनजागृती'साठी आयोजित कार्यक्रमात सहभागी झालेले मान्यवर.

# महिलांच्या कायदेशीर हक्कांच्या जनजागृतीसाठी कार्यक्रम

पुणे : 'सेंटर फॉर कम्युनिटी डेव्हलपमेंट' (सीसीडील) च्या वतीने आणि 'जिल्हा विधी सेवा प्राधिकरण', 'बहुजन हिताय, पुणे' आणि 'इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ लायन्स क्लब' यांच्या सहकार्याने 'कायदेशीर हक्कांच्या जनजागृती'साठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दापोडी येथे झालेल्या या कार्यक्रमात 'बहुजन हिताय'च्या प्रकल्प समन्वयक मालती वानखेडे, 'विधी सेवा प्राधिकरणा'च्या ॲड. प्रीती परांजपे, 'सीसीडील'च्या समन्वयक प्रा. उज्ज्वला साखळकर आणि प्रा. डॉ. अनीसा शेख उपस्थित होत्या. प्रा. उज्ज्वला साखळकर यांनी कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ आणि त्याबाबतच्या कायदेशीर बाबी यासंदर्भात माहिती दिली. विशाखा प्रकरण काय आहे? आणि लैंगिक छळ कायद्यांच्या आधारे कसा न्याय मिळवता येवू शकतो, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. डॉ. अनीसा शेख यांनी 'हिंदू विवाह कायदा' आणि घटस्फोटाच्या कायद्यांविषयी माहिती दिली. तसेच हिंदू विवाहाच्या अटी आणि वैधतेबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. तर ॲड. प्रीती परांजपे यांनी 'कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा' आणि त्याअंतर्गत संरक्षणासंदर्भात चर्चा केली. तसेच कलम ४९८ (ए) चा कशा प्रकारे गैरवापर केला जातो, याची माहिती दिली. वारसाहक्कानुसार असलेल्या संपत्तीत महिलांचे काय अधिकार आहेत. त्यांना हा हक्क कसा मिळवता येऊ शकतो, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.